# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०४.१०.२४ (शुक्रवार)

..............................................................................................................................

**पोलीस स्टेशन सावनेर अप क्र ९४७/२४ कलम २८१, १०६(१) बीएनएस सहकलम १८४ मोवाका मधील अज्ञात मृतक अज्ञात बाबत.**

**दिनांक ०२.१०.२४ रोजी चे दुपारी ०३.०० वा ते ०३.१५ वा. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अज्ञात मृतकला ठोस देवुन पळुन गेला. व मृतकचे मरणास कारणीभुत झाला. फिर्यादी श्री शुभम भिवलाल बिसेन वय १९ वर्ष रा सागर रेस्टॉरेंन्ट, एन एच ४७ रोड, पाटनसावंगी ता सावनेर यांनी दिलेल्या तक्रारीवरून वरील कलमान्वयें गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आलेला आहे.**
मृतकचे वर्णन :— पुरूष वय ४५ ते ५० वर्ष, रंग सावळा उंची १६४ ते १६५ से.मी, रंग सावळा, शरीर बांधा—मजबुत, गळयात—काळा रंगाचा धागा, डाव्या हातात —लाल, काळा रंगाचा धागा, उजव्या हाताचे दुस—या चौथ्या बोटात बाजारू अंगठी, व उजव्या हातावर भिमराव असे गोंदलेले, अंगात आकाशी रंगाचा उभ्या रे ाा, असलेला फुल बाहीचा शर्ट, त्याखाली ब्लॅक रंगाची टी शर्ट, मागील बाजुने एन आर ग्रुप असे इंग्रजीत लिहीलेले, कमरेला लाल रंगाचा कडदोरा त्याला भगव्या रंगाचा दुप्पटा लागलेला आहे. मृतकचे शरीरवर डाव्या भागाला घसाटल्याचे निशान असुन उजवा पाय घोटयापासुन तुटलेला आहे.

वरील वर्णनाचा मृतक यास ओळखत असल्यास त्या बाबत काही माहीती असल्यास पोलीस स्टेशन सावनेर जिल्हा नागपूर ग्रामीण येथे प्रत्यक्ष अथवा खालील नमदु संपर्क क्रमांकावर संपर्क करावा. सदर गुन्हयाचा तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर श्री अनिल म्हस्के, पोलीस निरीक्षक उमेश पाटील पोस्टे सावनेर, यांचे मार्गदर्शनात स.पो.नि मंगला मोकाशे, पोहवा/राजेश हावरे, पोहवा अतुल खोडनकर, पोना कपील तभाने करीत आहे.
संपर्क क्र :— पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील —०७११३ २३२२०९, मोन. ९८२२५११७५१, सपोनि मंगला मोकाशे मो नं ८३८०८५०३५०

**अवैधरित्या रेती चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोद.**

दि. ०४/१०/२०२४ रोजी सकाळी पोलीस स्टेशन अरोली चे ठाणेदार सपोनि स्नेहल राऊत, यांनी दिलेल्या कर्तव्यावरून वापस येत असतांना दोन लाल रंगाचे स्वराज कंम्पनीचे ट्रॅक्टर रेती भरून निमखेडा ते पारडी कला रोडनी जात असल्याबाबत मुखबीर कडुन पक्की माहीती मिळाल्याने सपोनि राऊत आणि पोउपनि सोनवने तसेच पोलीस अंमलदार यांनी सापळा रचुन व्यकंटेश्वर बुरपल्ली राईसमिलचे जवळ स्वराज कंपनीचे दोन लाल रंगाचे ट्रॅक्टर त्यापैकी एक ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.एक्स ०३२५ तसेच स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.ए. ९४३४ दोन्ही विना नंबरीची ट्रॉली ची पाहणी केली असता ट्रॉली मध्ये अंदाजे १ — १ ब्रास रेती दिसुन आल्याने चालक नामे १) खुबलाल तिरंगा लाठीया वय २५ वर्ष रा. बाबदेव तह.मौदा जि.नागपुर, व २) बिजेस किसन कोडापे वय २६ वर्ष रा. बाबदेव तह.मौदा जि. नागपुर यांना सदर दोन्ही ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये असलेल्या रेती वाहतुकीबाबत परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितल्याने

१) लाल रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.एक्स ०३२५ व लाल रंगाची विना नंबरीची ट्रॉली ज्यामध्ये अंदाजे १ ब्रास रेती कि.३०००/— व ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.एक्स ०३२५ कि.४,००,०००/— व लाल रंगाची विना नंबरीची ट्रॉली . १,५०,०००/— रूपये व चालकचा ओपो कंपनीचा ॲनराईड मोबाईल कि. १०,०००/— रूपये. असा एकुन ५,६३,०००/— रूपये

२) लाल रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.ए. ९४३४ व लाल रंगाची विना नंबरीची ट्रॉली ज्यामध्ये अंदाजे

१ ब्रास रेती कि.३०००/— व ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.ए. ९४३४ कि.४,००,०००/— व लाल रंगाची विना नंबरीची ट्रॉली कि. १,५०,०००/— रूपये व चालकचा विवो कंपनीचा ॲनराईड मोबाईल कि. १०,०००/— रूपये. असा एकुन ५,६३,०००/— रूपये असा एकुन ११,२६,०००/— रूपयाचा मुद्देमाल घटनास्थळा वरून पंचासमक्ष ताब्यात घेवून जप्त करण्यात आला व पोलीस स्टेशन अरोली येथे वरिल दोन्ही ट्रॅक्टर चालक आणि ट्रॅक्टर मालक आकाश अरूण कारेमोर वय २६ वर्ष रा. बाबदेव यांच्या विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत, स.पो.नि. ठाणेदार, पोलीस स्टेशन अरोली, नागपूर ग्रामीण, पोउपनि सुशिलकुमार सोनवने, पोहवा संदिप बाजनघाटे, पोशि विक्की कोथळे, सचिन मुदनर यांनी केली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे**.



## महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखुचा मोठा साठा विक्री करणारा, गोडेगाव कन्हान मधील आरोपीकडून २ लाख १८ हजार रूपयाचा सुंगधीत तंबाखु कारसह जप्त करून आरोपीस केले गजाआड.

## ( कन्हान डि.बी. पथकाची धडाकेबाज रेड कार्यवाही)

दिनांक ०३.१०.२०२४ रोजी स.पो.नि. राहुल डी. चव्हाण, सोबत पो.हवा/हरीष सोनभद्रे, चालक पो.हवा. /संदीप गेडाम पो.ना/ अमोल नागरे, पो.ना/ महेश बिसने पो. स्टे. कन्हान असे मिळुन पो. स्टे. परीसरात पेट्रोलींग करीता शासकिय वाहणाने रवाना होवुन पेट्रोलींग करीत असता मौजा गोडेगाव येथे मुखबीरव्दारे गोपनीय माहीतीच्या आधारे दोन पंचाना बोलावून जुना गोडेगाव येथे एका इसमाच्या घरासमोर उभी असलेल्या अल्टो कार क. MH 49 86766 कारमध्ये बॉक्स व बोरीमध्ये संशईत सुंगधित तंबाखु दिसून येत असल्याने घरातील इसमास आवाज देवून त्यांचे नाव, गाव विचारले असता त्याने आपले नाव —**रमेश सखाराम नेवारे वय ३८ वर्ष रा. जुना गोळेगाव** असे सांगितले. पंचासमक्ष कार ची झडती घेतली असता कारमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखु १) बागबान तंबाखु ४७ कंपनीचे प्रतिबंधीत तंबाखुने भरलेले ज्यावर तंबाखु सेवन याने अकाल मुत्यु असे लिहले आहे. ७३ टिनाचे डब्बे वनज प्रत्येकी ५०० प्रा. प्रत्येकी कि. ७२५/—रू प्रमाणे— कि.५२९२५/—रू माल २) जनम तंबाखु नावाचे प्लस्टीकची पिशवी प्रतीबंधीत तंबाखुने भरलेली ज्यावर जनम तंबाखु ५३५ चेतावणी लिहलेली प्रत्येकी ५०० ग्राम वजनाचे दोन बोरीमध्ये प्रत्येकी ४२ —४२ नग किमत प्रत्येकी २५०/—रू प्रमाणे किमत १०५००/—रू माल ३) गोल्डन सफारी नावाचे प्लास्टीकचे पिशवी प्रतीबंधीत तंबाखूने भरलेली ज्यावर Golden safari TM Zafrini Zarda ९९९ चेतावणी लिहलेली वनज प्रत्येकी १ किलोग्रॅम वजनाचे दोन बोरीत प्रत्येकी १०—१० नग किमत प्रत्येकी५५०/—रू प्रमाणे किमत ५५००/—रू सुंगधीत तंबाखु एकुण ६८९२५/—रू चा माल ४) एक

पांढ—या रंगाची अल्टो कार क. MH 49 B 6766 किमत १,५०,०००/—रू अशा एकुण २,१८,९२५/—रू चा मुद्देमाल आरोपीच्या तांब्यातुन जप्त करण्यात आला. सदर आरोपी विरूध्द पो.स्टे. कन्हान येथे अप.क्र. ६६४/२४ कलम २७४,२७५,१२३,२२३ भान्यास २०२३ सहकलम २६(२) (ii), (iv), २७ (२) (इ) ३०(२) (अं) अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मार्गदर्शनाखाली मा श्री संतोष गायकवाड कन्हान विभाग यांचेसह पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्री राहुल चव्हान, पोहवा हरीश सोनभदे, अमोल नांगरे, पोना/ महेश बिसने पोअं/ अश्विन गजभिये, आकाश शिरसाट, चालक पोहवा संदीप गेडाम यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## कत्तलीकरीता नेणा—या जनावरांची सुटका २ आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली येथे अंतर्गत** धानोली शिवार येथे **दिनांक** ०३/१०/२४ चे ०८.०० ते ०८.४५ वा. दरम्यान, यातील योध्दा पिकअप गाडी क्र.एम.एच. ३६ ए.ए. २९९० मध्ये चा चालक नामे अंकेश नत्थु चोपकर वय ३१ व ा रा. जांब तह.मोहाडी जि. भंडारा यांने त्याचे ताब्यातील वाहनामध्ये मालक आरोपी नामे —अंकुश शिवचरण हटवार रा. अंबागड तह. तुमसर यांचे सांगणे वरून योध्दा पिकअप गाडी मध्ये अवैधरित्या म्हैस, हैले, तोंड बांधुन निर्दयतेने, कोंबुन चा—या पाण्याची व्यवस्था न करता जनावरांच्या जिवीतास धोका निर्मान होईल प्रकारे नि काळजीपणे वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींकडुन **योध्दा पिकअप गाडी क्र.एम.एच.३६ ए.ए. २९९० किमंती ४,००,०००/—रू व जप्त वाहनामध्ये २ म्हशी ५ हेले किमंती १,०५,०००/—रू चा माल/— रू असा एकुन ५,०५,०००/—रू** चा माल आरोपीतांकडुन जप्त केला. सदर म्हशी व हेले हे पालन पोषन व सुरक्षा, संवर्धनासाठी मान्यताप्राप्त गौशाळे मध्ये दाखल करण्यात आले.

सदर गुन्हयातील आरोपी नामे— १) अंकेश नत्थु चोपकर वय ३१ वर्ष रा. जांब तह.मोहाडी जि. भंडारा, २) अंकुश शिवचरण हटवार वय ३० वर्ष रा. अंबागड तह. तुमसर यांचे विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे कलम २८१,१२५,४९ भा.न्या.सं. सहकलम ११(१),(ड) प्रा.छ. प्रति. अधि.सह क. १८४ मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा/ दत्ता बघमारे मो.न. ७०३०१०९९६४ पोस्टे अरोली हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत व त्यांचे स्टाफ नी पार पाडली.

## महाराष्ट्र राज्यात निबंध असलेला सुगंधीत तंबाखु व गुटख्याची मध्यप्रदेशातुन केळवद मार्गे वाहतुक करणारा आरोपी गजाआड एकुण एकुण ६.२१,०५०/— रू. चा माल जप्त

श्री. अनिल म्हस्के (भा.पो से) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांना गोपनीय माहीती मिळाली की, मध्यप्रदेशातुन सातळी जटामखोरा मार्ग केळवद येथे एका सिल्हर रंगाचे स्वीफ्ट कारमध्ये महाराष्ट्र राज्यात निर्बंध असलेला सुगंधीत तबाखू व गुटख्याची वाहतुक होत आहे. यावरून त्यांनी त्याचे कार्यालयातील स्टॉफ पातविला असता सदर स्टॉफन पो स्टे केळयट हद्दीतील केळवद ते जटामखोरा रोडवर जावुन नाकाबंदी करून जटामखोरा गावाकडुन येणाऱ्या सिल्व्हर रंगाच्या मारूती सुझुकी स्वीफ्ट कार क्र. एम. एच. १६ ए.टी. १३४९ ला थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये १) पान मसाला (पान पराग) किंमती ६७,२०० रू. २) सुगंधीत तंबाखु (बागबान ४७) किंमती ५८,००० रू ३) सुगंधीत तबासु (रत्ना नं. ३०००) किंमती २३. ६०० रू. ४) सुगंधीत तंबाखु (जनम ५३५) किंमती ४७.२५० रु. ५) सुगंधीत तंबाखु (गोल्ड) किंमती २५,००० रु एकूण किंमती २,२१.०५०/— रू. असा महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठा, वितरण, वाहतुक विक्रीस निर्बंध असलेला संगुधीत तंबाखु व गुटखा मिळुन आल्याने कार बालक व मालक नामे गोपाल शेषराव कोल्हे वय ३८ वर्ष रा. वार्ड

क्र. ०५ तेलीपुरा केळवद याचे ताब्यातुन वरील वर्णनाचा सुगंधीत तंबाखु व गुटखा किंमती २.२१,०५०/— रू. तसेच मारूती सुझुकी स्वीफ्ट कार क्र. एम एच. १६ ए.टी. १३४९ किंमती ४,००,०००— रू. असा एकूण ६,२१,०५०— रू. चा माल जप्त करण्यात आला. त्यानंतर अन्न व औषधी प्रशासन नागपुर यांना माहीती दिल्यावरून श्रीमती एस.व्ही. बाभरे अन्न सुरक्षा अधिकारी हे पो.स्टे. केळवद येथे हजर येवून त्यांनी गुन्हा नोंद होण्यासाठी दिलेल्या लेखी फिर्यादीवरून पो. स्टे. केळवद येथे भारतीय न्यास संहिता २०२३ चे कलम १२३, २२३ सहकलम अन्न सुरक्षा व मानदे कायदा व त्या अंतर्गत नियम व नियमन चे कलम २६ (१), २६(२) (पअ), २७(३) (म), ३०(२) सह कलम ३(१) (२२) (पप) (अ) शिक्षापात्र कलम ५९ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री हर्ष पोव्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोहवा अनिल मुंढे, पोशि नितेश पुसाम, पियुष वाडीगे यांनी केलेली आहे.




दिनांक 10/04/2024 पो.स्टे.

---

नरखेड मर्ग क्रमांक 46/2024 तपास प्रगती माहीताबाबत,

याबाबत सविस्तर वृत असे की, दिनांक 02.10.2024 रोजी दाखल झालेल्या मर्ग मध्ये एकाच घरातील चार ईसम नामे विजय पचोरी, माला पचोरी , दिपक पचोरी व गणेश पचोरी हया दौघांनी दिनांक 01.10.2024 रोजीचे रात्रीचे दरम्यान 21/00 वाजता ते दिनांक 02/10/2024 चे सकाळी 9/30 वाजताच्या दरम्यान राहते घरामध्ये दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली असुन त्याबाबतचा मर्ग पो.स्टे. नरखेड येथे दाखल असुन तपास सुरु आहे.

सदरचे मर्गच्या तपास असुन दिनांक 04.10.2024 रोजीचे दरम्यान वृत्तपत्रांमध्ये गणपती विसर्जन च्या दिवशी मृतक गणेश पचोरी यास अज्ञात इसताने मारहाण केली तसेच घटनेच्या आदल्या रात्री मृतक हा जोरजोरात फोन वर बोलुन वाद करीत होता. तो प्रंचडओरडत होता अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. सदर माहीतीच्या अनुषंगाने सदरची प्रेस नोट्स जाहीर करण्यात येते की, पतसंस्था चालक यातील मृतक गणेश विजय पचोरी हा दिनांक 17.09.2024 रोजीचे 10/00 वाजताच्या दरम्यान गणपती विसर्जनाच्या दिवशी मातामायच्या मंदीरात पुजा करण्याकरीता गेला होता. तो नदीच्या बाजुला बसला होता त्याला उच्च रक्तदाबाच्या बिमारीमुळे अचानक तो नदीच्या पात्रात चक्कर येवुन पडला व स्वतहुन बाहेर आला तेथुन उपचारकामी खाजगी रुग्णालय, वरुड जिल्हा अमरावती येथे उपचार केले. तसेच घटनेच्या आदल्या दिवशी गणेश पचोरी हा फोनवर जोरजोरात बोलत असल्याबाबत आजुबाजुच्या लोकांकडे विचारपुस केली असता शेजारील लोकांनी गणेश पचोरी हा जामीनावर सुटल्यापासुन घरीच रहता होता तसेच फोनवर कोणासोबतही जोरजोरात बोलत नव्हता तसेच घटनेच्या आदल्या दिवशी सुध्दा फोनवर जोरजोरात बोलत नसल्याचे सांगितले. सदर मर्गची सखोल तपास सुरु आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर